**मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाकडून उपचाराकरिता**
**<u>देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याबाबत</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**मुख्यमंत्री सचिवालय,**
**क्रमांक: मुमंसनि-२०१५/प्र.क्र.०१/निधी कक्ष,**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मुंबई-४०० ०३२**
**दिनांक १३ ऑगस्ट, २०१५**

# प रि प त्र क

अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांकरिता येणाऱ्या खर्चासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील "**मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा**" मार्फत रुग्णांना आर्थिक मदत करण्यात येते. मुख्यमंत्री सचिवालयात यासंदर्भात मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज प्राप्त होतात. तथापि, या आजारांव्यतिरिक्तही जीवितास धोका असलेले आजार/ गंभीर अपघातातील अनेक रूग्ण असतात. या अनुषंगाने, राज्यातील अशा रूग्णांना उपचाराअभावी जीव गमवावा लागू नये म्हणून उपचाराकरिता त्यांना तात्काळ सहाय्य देण्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयामध्ये "**मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष**" स्थापन करण्यात आला आहे.

२. वैद्यकीय सहायता कक्षामध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करण्याकरिता **<u>वैद्यकीय सहायक कक्ष कार्यकारिणी समिती गठीत करण्यात येत आहे</u>**. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | अधीक्षक, सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई / अधीक्षक, जे.जे.रुग्णालय, मुंबई / उप संचालक (रुग्णालये), आरोग्य संचालनालय, मुंबई | सदस्य |
| २) | उप संचालक / सहाय्यक संचालक (निधी), मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई | सदस्य |
| ३) | डॉ.प्रज्ञा कासार, कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई | सदस्य |
| ४) | वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई | सदस्य |
| ५) | डॉ.आनंद बंग, सल्लागार, आदिवासी आरोग्य, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई | सदस्य |

३. सदर समितीची बैठक दर मंगळवारी व त्या दिवशी सार्वजनिक सुटी असल्यास त्यानंतरच्या कामकाजाच्या दिवशी होईल. तसेच समितीच्या बैठकीस वरीलपैकी किमान ३ सदस्य असणे आवश्यक राहील व त्यापैकी अनुक्रमांक १ मधील सदस्याची उपस्थिती अनिवार्य राहील. तथापि, प्रकरणपरत्वे जर रुग्णाला अर्थसहाय्य करण्याची तातडी असेल तर, समितीचे सदस्य चक्रीय पध्दतीने त्यासंबंधी निर्णय घेतील. मुख्यमंत्री सचिवालयातील आरोग्य कक्षास प्राप्त सर्व अर्जांची छाननी तसेच लाभार्थ्यांच्या पात्रतेकरिता मुख्यमंत्री सहायता निधीचे सर्व निकष लागू राहतील.

४. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अर्जांकरिता पात्र ठरणाऱ्या नागरिकांना मदत करण्यात येईल.

| अ.क्र. | आजाराचे नांव | रूग्णाची पात्रता | वैद्यकीय सहाय्याकरिता देण्यात येणाऱ्या मदतीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | हृदयरोग शस्त्रक्रिया | राजीव गांधी जीवनदायी योजनेमधील लाभार्थी वगळून इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रु. २ लाख पर्यंत |
| २. | ट्रॉमा | संबंधित डॉक्टरांनी प्रमाणित केल्याप्रमाणे रस्त्यावरील भीषण अपघातामध्ये गंभीर जखमी झालेली व्यक्ती (मुख्यत्वे करून डोक्याला गंभीर इजा झालेली व्यक्ती) | रू. १ लाख पर्यंत |
| ३. | कॅन्सर (सर्व प्रकार) | राजीव गांधी जीवनदायी योजनेममधील लाभार्थी वगळून इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रू. २ लाख पर्यंत |
| ४. | सेरेब्रो व्हॅस्कुलर ॲक्सिडंट (CVA) | • वय ५० वर्षे पेक्षा कमी<br>• आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रू. २ लाख पर्यंत |

उपरोक्त नमूद आजारांकरिता रुग्णास त्यापुढील रकान्यामध्ये दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेची मदत करावयाची असल्यास त्यासंबंधीचे संपूर्ण अधिकार हे मा.मुख्यमंत्री यांचे स्वेच्छाधिकार असतील.

५. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातून मदत हवी असल्यास पात्र रुग्णांनी **मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ (दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२६९४८)** येथे संपर्क साधावा.

सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Dr Pradnya Kasar

Digitally signed by Dr Pradnya Kasar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=413512, st=Maharashtra, cn=Dr Pradnya Kasar
Date: 2015.08.13 13:29:05 +05'30'

**(डॉ.प्रज्ञा कासार)**
**कक्ष अधिकारी,**
**मुख्यमंत्री सचिवालय**

**प्रत-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव,
२. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव,
४. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी,
६. अधीक्षक, सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई,
७. अधीक्षक, जे.जे.रुग्णालय, मुंबई,
८. उप संचालक (रुग्णालये), आरोग्य संचालनालय, मुंबई,
९. डॉ.आनंद बंग, सल्लागार, आदिवासी आरोग्य, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,
१०. वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग,
१२. निवड नस्ती.